सकाआ/ सुरमं/चं/चे आदेश/ ८२ /२०२४
चंद्रपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपुर
सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
नविन प्रशासकिय भवन, बस स्टॅन्ड समोर, चंद्रपुर
दि. ०५/०२/२०२४

## -: आदेश :-

**विषय - सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि इतर भत्ते यामध्ये दि. ०१.०१.२०२४ ते ३०.०६.२०२४ पर्यंत करण्यात आलेली निश्चिती.**

चंद्रपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने चंद्रपुर व गडचिरोली जिल्हातील मंडळात नोंदीत असलेल्या सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्यासाठी दि. ०१.०१.२०२४ ते ३०.०६.२०२४ या कालावधीकरिता विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि इतर भत्ते शासनाच्या धोरणाप्रमाणे वेळोवेळी होणारे बदल गृहीत धरुन निर्धारीत केलेले आहे.

सक्षम प्रधिकारी किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्रं. प्रा. वि/किवेअ/विभ/२०२४/कार्या-१०/ दि. ०५.०२.२०२४ अन्वये दि. ०१.०१.२०२४ ते ३०.०६.२०२४ या कालावधीकरीता विशेष भत्ता/महागाई भत्याचा दर रु. ३,०६८/- दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. ०५.०२.२०२४ रोजी निर्णय घेवुन मंडळाकडे नोंदीत असलेल्या सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि. ०१.०१.२०२४ ते ३०.०६.२०२४ या कालावधीकरीता रु. ३,०६८/- दरमहा निश्चित केलेला आहे.

**दि. ०१.०१.२०२४ ते ३०.०६.२०२४ या कालावधीकरीता वेतन व भत्ते यांचा तक्ता.**

| अ. क्रं. | हुददा | मुळ वेतन | विशेष महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणिक भत्ता | एकुण वेतन व भत्ते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक | ११,२३४ | ३,०६८ | १,४३० | ६०० | ६०० | ६०० | १७,५३२ |
| २. | सुरक्षा पर्यवेक्षक | १२,०६९ | ३,०६८ | १,५१४ | ६०० | ६०० | ६०० | १८,४५१ |
| ३. | सुरक्षा अधिकारी | १२,८४५ | ३,०६८ | १,५९१ | ६०० | ६०० | ६०० | १९,३०४ |

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतनावर (मुळ वेतन + विशेष भत्ता (महागाई भत्ता) किमान वेतन) मुख्य मालकांने ४३ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील. नोंदीत सुरक्षा रक्षकाच्या अतीकालीन कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मुळ वेतन + विशेष भत्ता (महागाई भत्ता) किमान वेतन) दुप्पट दराने देय राहील. सर्व आस्थापनांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांचे दि. ०१.०१.२०२४ पासुन वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या दराप्रमाणे मंडळाकडे निर्धारित वेळेत जमा करावेत, याबाबत शासन तसेच मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे मार्फत वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देश/आदेश आपणांस कळविण्यात येतील व ते आपणावर बंधनकारक राहील.

Security Guard Board * CHANDRAPUR (M.S.) *

सचिव
चंद्रपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपुर
तथा सरकारी कामगार अधिकारी